Impact Factor 2.147

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Publish Journal

VOL-III ISSUE-VIII Aug. 2016

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
- aiirjpramod@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# मराठवाडा विभागातील अध्यापक महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थींच्या भावनिक बुध्दिमत्तेचा व व्यक्तीमत्व वर्तन संघात प्रकाराचा तौलनिक अभ्यास.

प्रा.श्री.सोनुने एस.एस.
संशोधक अध्ययनार्थी
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद

डॉ.शेख एच .एम.
सहयोगी प्राध्यापक
शासकिय अध्यापक महाविद्यालय नांदेड.

आधुनिक युग हे माहिती व तंत्रज्ञानाचे युग म्हणून ओळखले जाते. प्रत्येक व्यक्ती 'स्व' – विकासासाठी सर्व क्षेत्रात वावरत असल्याने त्यातून जबरदस्त स्पर्धा निर्माण होत आहे. या वाढत्या स्पर्धेच्या युगात मानवाने विज्ञान व तंत्रज्ञानाच्या साह्याने निसर्गावर विजय मिळविण्याचा प्रयत्न केला असला,तरी त्यास अनेक आघाड्यावर पराभूत व्हावे लागत आहे. जीवन जगत असतांना प्रत्येक व्यक्तीला अनेक समस्यांचा सामना करावा लागतो .यातील काही प्रसंगामध्ये व्यक्ती यशस्वी होतात,तर काही प्रसंगामध्ये हतबल होऊन नैराश्याकडे, व्यसनाकडे, मानसिक विकृतिकडे वळलेल्या,वा अति चिंता, ताण-तणावामुळे आत्महत्येस प्रवृत्त झालेल्या दिसून येतात.

भावनिक बुध्दिमत्ता व व्यक्तीमत्व वर्तन संघात व्यक्तीचे वर्तन निर्धारित करणाऱ्या बाबी असून,त्या अधिक्याने अर्जित असतात. भावनिक बुध्दिमत्ता अधिक असल्यास व्यक्ती भावनांचे व्यवस्थापन सयोग्य साधून समायोजित करते. व्यक्तीमत्व वर्तन संघात (अ व ब प्रकार) वैशिष्ट्यांनूसारही व्यक्तीचे वर्तन निर्धारित होत असते.

कुमार व युवा अवस्थेत काळ एकात्म व एकसंघ व्यक्तीमत्व विकासाच्या दृष्टीने महत्वपूर्ण आहे. व्यक्तिच्या व्यक्तीमत्वाचा सर्वांगिण विकास हे शिक्षणाचे ध्येय साध्य करण्याची प्रमुख जबाबदारी शिक्षकांवर येऊन पडते. हे ध्येय साध्य करण्यासाठी तेवढाच शिक्षक असणे आवश्यक आहे. 21 व्या शतकात जागतिक व स्थानिक परिस्थिचे अवलोकन केले असता वर्तमान परिस्थितीला यशस्वीपणे सामोरा जाणारा सुदृढ व आरोग्यसंपन्न नागरिक तयार होणे अपेक्षित आहे. यानूसार या स्तरावर अध्यापन करणारा व अध्यापक व त्याचे व्यक्तीमत्व संपन्न असणे आवश्यक आहे. तेव्हा शिक्षणशास्त्र पदवी अभ्यासक्रमातून एकसंघ अध्यापकिय व्यक्तीमत्व विकसित होणे आवश्यक आहे. यासाठी शिक्षणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाची रचना झालेली दिसून येते आणि या अभ्यासक्रमाचा प्रशिक्षणार्थी छात्राध्यापक व छात्राध्यापिका यावर प्रभाव पडतो.

म्हणून संशोधकाच्या मनात काही प्रश्न निर्माण झाले जसे की, छात्राध्यापक, छात्राध्यापिकांची भावनिक बुध्दिगुणांकाचे प्रमाण किती व कसे असेल, भावनिक बुध्दिमत्ता व व्यक्तीमत्व वर्तन संघात या बाबतीत सहसंबंध कशा स्वरुपाचे आहे. धन असेल तर कसे, ऋण असेल तर कसे असे अनेक प्रश्न संशोधकाच्या मनात निर्माण झाल्याने संशोधकाने प्रस्तूत संशोधन विषयाची निवड केली आहे.

कार्यात्मक शब्दाच्या व्याख्या

१) प्रशिक्षणार्थी – शिक्षणशास्त्र पदवी (बी.एड.) अभ्यासक्रम पूर्ण करीत असलेले छाध्यापक (मुले) छात्राध्यापिका (मुली)

२) भावनिक बुध्दिमत्ता – अनूकुल हिंडे, उपिंदर धर व संज्योत पेंढे यांच्या प्रमाणित केलेल्या भावनिक बुध्दिमत्ता चाचणी अध्यापक महाविद्यालयातील छात्राध्यापक व छात्राध्यापिकाकडून सोडून घेतल्यानंतर मार्गदर्शन पुस्तिकेनूसार त्यांना प्राप्त झालेले भावनिक बुध्दिगुणांक.

३) व्यक्तीमत्व वर्तन संघात प्रकार – उपिंदर धर व मनिषा जैन यांच्या प्रामाणिक ‘अ’ व ‘ब’ व्यक्तीमत्व वर्तन संघात चाचणीद्वारे छात्राध्यापक व छात्राध्यापिका यांना मार्गदर्शन पुस्तिकेच्या आधारे प्राप्त गुणांक त्यानुसार निश्चित झालेला व्यक्तीमत्व वर्तन संघात प्रकार.

४) अ व्यक्तीमत्व वर्तन संघात प्रकार

–उपिंधर धर व मनिषा जैन यांच्या व्यक्तीमत्व संघात मापनी नुसार व्यक्तीमत्व संघात गुण वेळभान, उतावीळपणा, अस्खलितपणा, संपादनधारिता, प्राबल्यता व कार्यशिलता या घटकांचा / गुणांचा समावेश असलेले व्यक्तीमत्व वर्तन संघाताचे स्वरूप म्हणजे अ व्यक्तीमत्व वर्तन संघात प्रकार होय.

५) ब व्यक्तीमत्व वर्तन संघात प्रकार–उपिंधर धर व मनिषा जैन यांच्या व्यक्तीमत्व प्रकार मापनी नुसार व्यक्तीमत्व संघात गुण –आत्मसंतुष्ठता ,सरळस्वभावी पणा, अनाग्रहीपणा शांतताप्रियता, सहनशिलता या घटकांचा / गुणांचा समावेश असलेले व्यक्तीमत्व वर्तन संघात प्रकारचे स्वरूप म्हणजे ब व्यक्तीमत्व वर्तन संघात प्रकार होय.

संशोधन विषयाचे शीर्षक

“मराठवाडा विभागातील अध्यापक महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थींच्या भावनिक बुध्दिमत्तेचा व व्यक्तीमत्व वर्तन संघात प्रकाराचा तौलनिक अभ्यास करणे”.

संशोधनाची उद्दिष्टे-

१) अध्यापक महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थी छात्राध्यापक व छात्राध्यापिका यांच्या भावनिक बुध्दिमत्ता गुणांकाचा शोध घेणे.

२) अध्यापक महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थी छात्राध्यापक व छात्राध्यापिका यांच्या व्यक्तीमत्व वर्तन संघात प्रकाराचा शोध घेणे.

संशोधन परिकल्पना

१) अध्यापक महाविद्यालयातील छात्राध्यापकांपेक्षा, छात्राध्यापिकांची भावनिक बुध्दिमत्ता (गुणांक) अधिक असावी.

संशोधनाची व्याप्ती

**१) क्षेत्र व्याप्ती** - प्रस्तुत संशोधनाची क्षेत्र व्याप्ती मराठवाडा विभागातील जिल्ह्यांच्या भौगोलिक क्षेत्रांशी संबंधित आहे.

**२) आशय व्याप्ती** - सदर संशोधनाची आशय व्याप्ती ही अध्यापक महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थी छात्राध्यापक व छात्राध्यापिका यांच्या व्यक्तीमत्वांची केलेली तुलना व चिकित्सा या आशयाशी संबंधित आहे.

**३) नमुना व्याप्ती** - प्रस्तूत संशोधनासाठी नमुना व्याप्ती ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संलग्नीत सर्व अध्यापक महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थी छात्राध्यापक व छात्राध्यापिकांशी संबंधित आहे.

४) **कालावधी व्याप्ती** - प्रस्तूत संशोधन व्याप्ती ही शैक्षणिक वर्षे 2012 - 15 या कालावधीशी संबंधित आहे.

संशोधनाची मर्यादा-

**१) क्षेत्रमर्यादा** - प्रस्तूत संशोधनाची क्षेत्र मर्यादा मराठवाडा विभागातील फक्त औरंगाबाद बीड, जालना, उस्मानाबाद या जिल्ह्यांच्या भौगोलिक क्षेत्रांच पूरतीच मर्यादीत आहे.

**२) आशय मर्यादा** - सदर संशोधनाची आशय मर्यादा ही अध्यापक महाविद्यालयातील प्रशिक्षण छात्राध्यापक व छात्राध्यापिका यांच्या मधील केवळ भावनिक बुध्दिमत्ता (गुणांक) व व्यक्तीमत्व वर्तन संघात पातळी व प्रकार यांची परस्पर केलेली तुलना व चिकित्सा या अभ्यासापूरतीच मर्यादीत आहे.

**३) नमुना मर्यादा** - प्रस्तूत संशोधनाची नमुना मर्यादा म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाशी संलग्नीत अध्यापक महाविद्यालयातील जनसंख्येतून इच्छित नमुना निवछ पध्दतीने निवडलेले प्रशिक्षणार्थी छात्राध्यापक व छात्राध्यापिकांपूरतीच आहे.

४) **कालावधी मर्यादा** - प्रस्तूत संशोधन हे शैक्षणिक वर्षे 2013-14 या वर्षातील अध्यापक महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थी छात्राध्यापकिांकडून व छात्राध्यापिकांकडून प्राप्त झालेल्या माहिती पूरतेच मर्यादीत असून हे संशोधन कार्य हे शैक्षणिक वर्ष 2012-15 या कालावधीत पूर्ण केलेले आहे.

**संशोधनाची पध्दती-**

प्रस्तूत संशोधन कार्यासाठी वर्णनात्मक सर्व्हेक्षण पध्दतीचीनिवड करण्यात आलेली आहे.

**संशोधनाचा नमुना –**

सदरील संशोधनासाठी जनसंख्येतुन २५० छात्राध्यापक व २५० छात्राध्यापिका यांची निवड करण्यात आली

**संशोधनाचे साधने-**

भावनिक बुध्दिमत्ता मापन करण्यासाठी अनुकूल हिंडे, उपिंदर धर, व संज्योज पेढे यांची प्रमाणित केलेली चाचणी. तसेच व्यक्तीमत्व वर्तन संघात प्रकाराचा शोध घेण्यासाठी उपिंदर धर व मनिषा जैन यांच्या प्रमाणित 'अ' व 'ब' व्यक्तीमत्व वर्तन संघात चाचणीचा वापर सदरील संशोधनासाठी केला आहे.

**संशोधन सांख्यिकीय पध्दती-**

माहितीचे विश्लेषण, सारणीकरण व अर्थनिर्वचन करण्यासाठी टक्केवारी, मध्यमान, परिक्षिका या सांख्यिकीय तंत्रांचे उपयोजन केलेले आहे. प्रतिसादक छात्राध्यापक व छात्राध्यापिका यांची भावनिक बुध्दीमत्ता दर्शविण्यासाठी टक्केवारी या तंत्राचा उपयोग करण्यात आला आहे. छात्राध्यापक व छात्राध्यापिका यांच्या व्यक्तिमत्व वर्तन संघात प्रकाराचे सरासरी उत्तर शोधण्यासाठी व त्यातील विचलन पाहण्यासाठी मध्यमान व प्रमाण विचलन सांख्यिकी तंत्राचा वापर करण्यात आला.तसेच दोन गटात विविध स्तरावर तुलना करून त्यातील फरकाची सार्थकता तपासण्यासाठी T परिक्षिका या सांख्यिकीय तंत्राचा वापर करण्यात आलेला आहे.

**संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थ निर्वाचन**

1 )छात्राध्यापक व छात्राध्यापिकामधील भावनिक बुध्दिमत्तेच्या घटकनिहाय मध्यमान दर्शविणारा तक्ता

| अ. क्र. | भावनिक बुध्दिमत्ता घटक / क्षमता | छात्राध्यापक | छात्राध्यापिका |
|---|---|---|---|
| 1 | स्व-जाणीव | 11.024 | 10.680 |
| 2 | सहसंवेदना | 13.992 | 15.040 |

| | | | |
|---|---|---|---|
| 3 | स्वप्रेरणा | 18.612 | 18.396 |
| 4 | भावनिक स्थैर्य | 10.608 | 10.860 |
| 5 | संबंधाचे व्यवस्थापन | 10.644 | 10.976 |
| 6 | सचोटी | 8.116 | 8.348 |
| 7 | स्व-विकास | 5.620 | 5.580 |
| 8 | मूल्ये - जोपासना | 4.600 | 4.332 |
| 9 | उत्तरदायित्वाची जाणीव | 4.564 | 4.700 |
| 10 | निस्वार्थी वर्तन | 4.684 | 5.000 |
| | एकूण | 92.464 | 93.912 |

निरिक्षणे :

1) भावनिक बुध्दिमत्तेच्या स्वजाणीव क्षमतेचे छात्राध्यापकामधील मध्यमान 11.02 आहे तर छात्राध्यापिकामधील स्वजाणीव क्षमतेचे मध्यमान 10.68 असे आहे.
2) छात्राध्यापकामधील सहसंवेदना या क्षमतेचे मध्यमान 13.992 इतके आहे तर छात्राध्यापिकामधील सहसंवेदना क्षमतचे मध्यमान 15.040 इतके आहे.
3) छात्राध्यापकामधील स्वप्रेरणा या क्षमतेने मध्यमान 18.61 इतके आहे तर छात्राध्यापिकामधील स्वप्रेरणा क्षमतेचे मध्यमान 18.40 असे आहे.
4) छात्राध्यापकामधील भावनिक स्थैर्य या क्षमतेचे मध्यमान 10.61 असे आहे तर छात्राध्यापिकामधील भावनिक स्थैर्य या क्षमतेचे मध्यमान 10.86 असे आहे.
5) छात्राध्यापकामध्ये आढलेल्या संबंधाचे व्यवस्थापन या क्षमतेचे मध्यमान 10.64 असेआहे तर छात्राध्यापिकामधील क्षमतेचे मध्यमान 10.98 असे आहे.
6) छात्राध्यापकामध्ये सचोटी या क्षमतेचे मध्यमान 8.12 असे आहे तर छात्राध्यापिकामधील सचोटी क्षमतेचे मध्यमान 8.35 असे आहे.
7) छात्राध्यापकामध्ये स्व विकास क्षमतेचे मध्यमान 5.62 असेआहे तर छात्राध्यापिकामधील क्षमतेचे मध्यमान 5.58 असे आहे.
8) छात्राध्यापकामध्ये मूल्य जोपासणा या क्षमतेचे मध्यमान 4.60 असे आहे तर छात्राध्यापिकामधील क्षमतेचे मध्यमान 4.33 असे आहे.
9) छात्राध्यापकामध्ये उत्तरदायित्वाची जाणीव क्षमतेचे मध्यमान 4.56 असे आहे तर छात्राध्यापिकामधील या क्षमतेचे मध्यमान 4.70 असे आहे.

10) छात्राध्यापकामध्ये निस्वार्थी वर्तन क्षमतेचे मध्यमान 4.68 असे आहे तर छात्राध्यापिकामधील क्षमतेचे मध्यमान 5.0 असे आहे.

11) छात्राध्यापकामध्ये भावनांकाचे मध्यमान 92.64 इतके असून छात्राध्यापिकामधील भावनांकाचे मध्यमान 93.91 असे आहे.

निष्कर्ष :

१) भावनिक बुध्दिमत्तेतील स्व-जाणीव, स्वप्रेरणा, स्वविकास व मूल्ये जोपासणा-या क्षमतांचे छात्राध्यापकामधील मध्यमान छात्राध्यापिकांच्या तुलनेत अधिक आहे तर सहसंवेदना भावनिक स्थैर्य संबंधाचे व्यवस्थापन, सचोटी, उत्तरदायित्वाची जाणीव व निस्वार्थी वर्तन या क्षमतांचे मध्यमान छात्राध्यापिकामधील क्षमतेचे अधिक आहे.

२) अध्यापक महाविद्यालयातील छात्राध्यापकांच्या भावनिक बुध्दिमत्तेच्या एकून समग्र मध्यमानापेक्षा छात्राध्यापिकांमधील भावनिक बुध्दिमत्तेचे समग्र मध्यमान अधिक असून यावरून छात्राध्यापकापेक्षा छात्राध्यापिकामध्ये भावनिक बुध्दिमत्तचे मध्यमान वरच्या पातळीवरील असल्याचे दिसून येते.

छात्राध्यापक छात्राध्यापिकांमधील भावनिक बुध्दिमत्तेचे (भावनांकाचे) स्तरनिहाय प्रमाण व तुलना

उद्देश :

प्रतिसादक प्रशिक्षणार्थी छात्राध्यापक व छात्राध्यापिकायांच्याकडून सोडवून घेतलेल्या भावनिक बुध्दिमत्ता मापनीद्वारे त्यांच्या भावनांकाचे मापन केले असता साधारण: प्रतिसादकांचे एकत्रित स्वरूप कसे आहे, निम्न, साधारण व उच्च क्षमता पातळीवरील प्रमाण कसे आहे? लिंगभेदानुसार छात्राध्यापक व छात्राध्यापिका यांच्या भावनांकामध्ये काय फरक आहे याची तौलनिक चिकित्सा करण्याचा उद्देशाने या माहितीचे विश्लेषण केले त्यांचे विश्लेषण खालील प्रमाणे

छात्राध्यापक छात्राध्यापिकांमधील भावनिक बुध्दिमत्तेचे (भावनांकाचे) स्तरनिहाय प्रमाण

| भावनिक बुध्दिमत्ता पातळी | छात्राध्यापक | | छात्राध्यापिका | |
|---|---|---|---|---|
| | प्रतिसाद संख्या | शेकडा प्रमाण | प्रतिसाद संख्या | शेकडा प्रमाण |
| L | 46 | 18.40 | 18 | 7.20 |
| N | 102 | 40.80 | 116 | 46.40 |
| H | 102 | 40.80 | 116 | 46.40 |
| एकूण | 250 | 100 | 250 | 100 |

निरीक्षणे :

१) अध्यापक महाविद्यालयातील प्रतिसाद दिलेल्या 250 छात्राध्यापकामध्ये भावनांक बुध्दिमत्तेचे (भावनांक) प्रमाण 46 छात्राध्यापकांमध्ये निम्न 102 छात्राध्यापकामध्ये साधारण तर 102 छात्राध्यापकांमध्ये उच्च पातळीवर आढळले असून त्याचे शेकडा प्रमाण अनुक्रमे 18.40, 40.80 व 40.80 असे आहे.

२) अध्यापक महाविद्यालयातील प्रतिसाद दिलेल्या 250 छात्राध्यापिकामध्ये भावनांक बुध्दिमत्तेचे (भावनांक) प्रमाण 18 छात्राध्यापिकांमध्ये निम्न 116 छात्राध्यापिकामध्ये साधारण तर 116 छात्राध्यापिकांमध्ये उच्च पातळीवर आढळले असून त्याचे शेकडा प्रमाण अनुक्रमे 7.20, 46.40 व 46.40 असे आहे.

निष्कर्ष :

१) छात्राध्यापकांपेक्षा छात्राध्यापिकांमध्ये उच्च पातळीवरील भावनिक बुध्दिमत्तेचे (भावनांक) प्रमाण अधिक असून साधारण पातळीवरील प्रमाण ही छात्राध्यापिकामध्ये अधिक आहे. मात्र निम्न पातळीचे प्रमाण छात्राध्यापिकामध्ये तुलनेने बरेच कमी आहे.

२) छात्राध्यापकापेक्षा छात्राध्यापिकामध्ये भावनिक बुध्दिमत्ता अधिक ब-याच दर्जाची पातळीवर असलेली आढळून येते.

३) निम्न पातळीवरील भावनिक बुध्दिमत्तेचे प्रमाण छात्राध्यापिकांपेक्षा छात्राध्यापकामध्ये अधिक आहे.

छात्राध्यापक छात्राध्यापिकांमधील भावनिक बुध्दिमत्ता पातळीची (भावनांक) मध्यमान आधारे तुलना

उद्देश :

छात्राध्यापक व छात्राध्यापिका यांच्यातील भावनिक बुध्दिमत्तेमध्ये (भावनांक) फरक आहे काय? हे पाहण्यासाठी सदर चिकित्सा केलेली आहे

| छात्राध्यापक गटाचे मध्यमान | छात्राध्यापिका गटाचे मध्यमान | दोन्ही मध्यमानातील फरक |
|---|---|---|
| 92.46 | **93.91** | **1.45** |

निरीक्षणे:

१) छात्राध्यापकामधील भावनिक बुध्दिमत्ता पातळीचे (भावनांक) मध्यमान 92.46 असे आहे.

२) छात्राध्यापिकामधील भावनिक बुध्दिमत्ता पातळीचे (भावनांक) मध्यमान 93.91 असे आहे.

३) छात्राध्याप व छात्राध्यापिका यामधील भावनिक बुध्दिमत्ता (भावनांक) पातळीतील मध्यमानामध्ये 1.45 इतका फरक आहे.

**निष्कर्ष :**

१) छात्राध्यापकामधील भावनिक बुध्दिमत्ता (भावनांक) पातळीच्या मध्यमानापेक्षा छात्राध्यापिकामधील भावनिक बुध्दिमत्ता पातळीचे मध्यमान अधिक आहे

२) छात्राध्यापकापेक्षा छात्राध्यापिकामध्ये भावनिक बुध्दिमत्ता (भावनांक) पातळी काही प्रमापणात का होईना वरच्या पातळीवरील आहे.

**छात्राध्यापक छात्राध्यापिकांमधील भावनिक बुध्दिगुणांकाच्या (भावनांक) मध्यमानातील फरकाची सार्थकता तपासण्यासाठी क्रांतिक गुणोत्तराचा (CR) वापर**

**उद्देश :**

छात्राध्यापक व छात्राध्यापिका मधील भावनिक बुध्दिगुणांकाच्या (भावनांक) मध्यमानात असलेल्या फरकाची (1.448) सार्थकता तपासून शून्य परिकल्पनेचा पडताळा घेण्यासाठी क्रांतीक गुणोत्तर (CR) द्वारे 0.05 व 0.01 स्तरावर सदर फरकाची सार्थकता पडताळून परिकल्पनेची सत्यता तपासण्यात आली आहे.

**शून्य परिकल्पना :**

अध्यापक महाविद्यालयातील छात्राध्यापक व छात्राध्यापिका यांच्या भावनिक बुध्दिमत्ता पातळीत कोणताही फरक नाही. स्वाधीनता मात्रा (DF) 498 असतांना 0.05 सार्थकता स्तर 1.98 आणि 0.01सार्थकता स्तराचे मूल्ये 2.61 आहे. प्राप्त क्रातिक गुणोत्तर (CR) 0.0.54 हे 0.05 व या दोन्ही सार्थकता स्तरापेक्षा कमी असल्यामूळे दोन्ही गटाच्या मध्यमानातील फरक हा सार्थ वास्तव व लक्षणीय नाही हे सुस्पष्टपणे लक्षात येते यावरून छात्राध्यापकाची भावनिक बुध्दिमत्ता व छात्राध्यापिकांची भावनिक बुध्दिमत्ता यामध्ये सार्थक व विश्वसनीय असा फरक नाही यामुळे वरील शून्य परिकल्पना स्विकारण्यात येत आहे.

२) छात्राध्यापक व छात्राध्यापिकांमधील "अ" आणि "ब" व्यक्तीमत्व वर्तन संघात प्रकारचे प्रमाण दर्शविणारा तक्ता

| व्यक्तीमत्व वर्तन प्रकार | छात्राध्यापक | | छात्राध्यापिका | |
|---|---|---|---|---|
| | प्रमाण | टक्केवारी | प्रमाण | टक्केवारी |
| "अ" वर्तन प्रकार | 142 | 56.80 | 81 | 32.40 |
| "ब" वर्तन प्रकार | 108 | 43.20 | 169 | 67.60 |
| | 250 | 100 | 250 | 100 |

**निरीक्षणे :**

१) अध्यापक महाविद्यालयातील एकूण प्रतिसादक 250 छात्राध्यापकांचे व्यक्तीमत्व वर्तन संघात प्रकार मापन चाचणीद्वारे मापन केले असता "अ" व्यक्तीमत्वे वर्तन संघात प्रकार असलेले 142 छात्राध्यापक व "ब" व्यक्तीमत्व वर्तन संघात प्रकार असलेले 108 छात्राध्यापक आढळून आले असून त्याचे शेकडा प्रमाण अनुक्रमे56.80 व 43.20 असे आहे.

२) अध्यापक महाविद्यालयातील एकूण प्रतिसादक 250 छात्राध्यापिकांचे व्यक्तीमत्व वर्तन संघात प्रकार मापन चाचणीद्वारे मापन केले त्यामध्ये 81 छात्राध्यापिकांचा "अ" व्यक्तीमत्व वर्तन संघात प्रकार व 169 छात्राध्यापिकांचा "ब" व्यक्तीमत्व वर्तन संघात प्रकार आढळून आला असून त्याचे शेकडा प्रमाण अनुक्रमे 32.40 व 67.60 असे आहे.

**निष्कर्ष :**

१) छात्राध्यापकामध्ये "ब" व्यक्तीमत्व वर्तन संघात प्रकारापेक्षा "अ" व्यक्तीमत्व वर्तन संघात प्रकाराचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येते.

२) छात्राध्यापिकामध्ये "अ" व्यक्तीमत्व वर्तन संघात प्रकारापेक्षा "ब" व्यक्तीमत्व वर्तन संघात प्रकाराचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येते.

३) छात्राध्यापक व छात्राध्यापिकांचा व्यक्तीमत्व वर्तन संघात प्रकाराच्या दृष्टिने तौलनिक स्वरूपात चिकित्सा केली असता परस्पर विरोधी स्वरूप दिसून येते. छात्राध्यापकामध्ये "ब" पेक्षा "अ" व्यक्तीमत्व वर्तन संघात प्रकाराचे प्रमाण अधिक आहे तर छात्राध्यापिकामध्ये "अ" पेक्षा "ब" व्यक्तीमत्व वर्तन संघात प्रकाराचे प्रमाण अधिक आहे.

## शिफारशी

- प्राचार्यासाठी शिफारशी

1) भावनिक बुध्दिमत्ता व व्यक्तीमत्व वर्तन संघात विकासाच्या दृष्टिने शाळा महाविद्यालयातून विद्यार्थ्यांच्या शारिरीक आरोग्य तपासणीबरोबरच मानसिक आरोगय तपासणी व उपचाराची योजना करण्यात यावी.
2) प्रशिक्षणार्थी छात्राध्यापक, छात्राध्यापिका, विद्यार्थी यांच्या भावनिक बुध्दिमत्ता व व्यक्तीमत्व वर्तन संघात दृष्टिने अभ्यासपूरक व सहशालेय कार्यक्रम व उपक्रमाची योजना करावी.
3) अध्यापक, महाविद्यालयामध्ये विविध स्पर्धा, कार्यक्रम, उपक्रम शिबीरे व्याख्याने इ. आयोजन करण्यात येवून, त्यात सर्व अध्यापक व प्रशिक्षणार्थीचा सहभाग यासंबंधिचे नियोजन करावे व त्यास वार्षिक नियोजनात स्थान द्यावे.
4) प्रशिक्षणार्थी छात्राध्यापक व छात्राध्यापिका यांच्या सुसंघटीत व्यक्तीमत्व विकासाच्या दृष्टिने विविध व्यक्तीमत्व विकास शिबीर व व्याख्याने इ. चे आयोजन करण्यात यावे.
5) शाळा , महाविद्यालयाच्या ग्रंथालयामध्ये अभ्यासक्रमातील पुस्तकाबरोबरच इतर संदर्भ पुस्तके, व्यक्तीमत्व विकासाच्यासाठी आधारित पुस्तके, साहित्य, मासिक इ. उपलब्ध करुन देण्यात यावीत.

- अध्यापकांसाठी शिफारशी

१) अध्यापक विद्यालयातील प्रत्येक प्रशिक्षणार्थी छात्राध्यापक, छात्राध्यापिका यांना प्रशिक्षण काळातील प्रत्येक उपक्रम व कार्यात क्रियाशील रितीने सहभागी करुन घेण्याचा प्रयत्न करावा.
२) छात्राध्यापक व छात्राध्यापिका यांच्यामधील उपजत क्षमतांचा शोध घेवून त्यांचा योग्य दिशेने विकास साधण्यासाठी त्यांना विविध स्पर्धा, कार्यक्रम, उपक्रम इ. तून संधी मिळवून द्यावी.
३) प्रशिक्षणार्थी छात्राध्यापक व छात्राध्यापिका यांच्या ठिकाणी आत्मविश्वासू व आाशावादी वृत्तीची जोपासणा करण्यात यावी.
४) शिक्षक-प्रशिक्षण अभ्यासक्रमातून प्रशिक्षणार्थीच्या ठिकाणी मानसिक व भावनिक विकासाची संधी उपलब्ध करुन देवून , समायोजन क्षमता विकासाचे प्रयत्न करण्यात यावे.

५) प्रशिक्षणार्थींच्या ठिकाणी काही शारीरिक वा मानसिक व्यंग, न्यूनता असेल व त्यातून त्यांच्या ठिकाणी न्यूनगंडची भावना निर्माण होत असेल ,तर त्यांच्यातील न्यूनगंडाची भावना दूर करून, त्यांना परिस्थितीनुरुप वर्तन करण्यास प्रवृत्त करावे व आत्मविश्वासातील वाढीसाठी विशेष प्रयत्न करण्यात यावे.

संदर्भग्रंथ सूची –

1) आगलावे प्र. (2000) : संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे, नागरपूर : विद्या प्रकाशन.
2) कदम, चा.प. (1994) शैक्षणिक संख्याशास्त्र,पुणे : नुतन प्रकाशन, पूणे.
3) कर्डिले व महाले संजीवनी, (2000) संशोधन सांख्यिकी तंत्राचे उपयोजन, नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
4) करंदीकर सु.(2006) शैक्षणिक मानसशास्त्र कोल्हापूर : फडके प्रकाशन.
5) गोगटे व भागवतवार : सामान्य मानसशास्त्र, पूणे : कॉन्टेनेटल प्रकाशन.
6) घोटाळे रा. ना.(2003): समाजशास्त्रीय संशोधन तत्वे व पध्दती, नागपूर:श्री प्रकाशन.
7) देशपांडे प्र., पाटोळे एन.के. (1994) : संशोधन पध्दती – 1 यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ नाशिक.
8) देसाई आणि अभ्यंकर : संशोधन मानसशास्त्र आणि संशोधन पध्दती आवृत्ती –3 ,पूणे, नरेंद्र प्रकाशन.
9) पंडित बी.बी. (2003) : शिक्षणातील संशोधन, पुणे : नूतन प्रकाशन.
10) बोरुडे, रा.र. (2005) : संशोधन पध्दतीशास्त्र, पुणे : विद्यार्थी गृह प्रकाशन.
11) भदौरिया, मृद्दला आणि सिंह अनिता (2006) भारतीय आधुनिक शिक्षा एन.सी.ई.आर.टी. भोपाळ
12) भार्गव,एम. आधुनिक मनोवेज्ञानिक परिक्षण व मापन, आगरा : हरिप्रसाद भार्गव प्रकाशन, आगरा.
13) भितांडे वि.रा.(2004): शैक्षणिक संशोधन पध्दती, पूणे : नुतन प्रकाशन.
14) मुळे रा.श. आणि उमाठे वि.तू.(1949):शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे, औरंगाबाद: .विद्याबुक प्रकाशन.
15) मोहसिन, एम. एवं प्रसार,पी (2000).मनोवैज्ञानिक अनुसंधान पध्दती विज्ञान,दिल्ली : मोतिलाल बनारसीदास प्रकाशन दिल्ली

इंग्रजी – संदर्भ ग्रंथसूची

1. Aggrawal,J.C. (1975) educational research on introducation, new delhi-5
2. Best john, (2002) research in education (third ed.) new delhi : prentice hall of india pvt. Ltd.
3. Buch, M.B. (1979), a survey of research in education. Voll . I to V. baroda.
4. Garret,H.E. (1981) statstics in psychology and education.: Mumbai vakilas felter and pvt. Ltd.